# अशा अवेळी

चंद्रकुमार नलगे

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

B137

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**अशा अवेळी : चंद्रकुमार नलगे**
'चंद्रबन', साहित्य निवास कॉलनी,
उजळाईवाडी, कोल्हापूर.
फोन : ०२३१ - २६७७०३४

© **शितल मेहता**
कोल्हापूर.

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंती प्रिंटरी

**आवृत्ती**
२९ ऑगस्ट, २०१३

**किंमत**
रुपये १६०/-

प्रिय,
ज्ञानेश्वर मुळे
(उच्चायुक्त, मालदीव.)
-तुमच्या व्यक्तिमत्वात
मुरलेल्या माती, पंख
आणि
आकाशास

## कथानुक्रम


- अशा अवेळी पैलतीरावर /७
- नातं /२१
- आरिष्ट /३१
- उसवलेली नजर /४१
- शून्य /५४
- आधार /६७
- प्रेमपत्र संशोधन /७७
- धुकं /८९
- परका /९७
- आच /१०६
- हेही नाटकच तर /१२१
- परीक्षा /१३२
- टॅक्सी /१४६
- सबूद /१५७


✦✦✦

# अशा अवेळी पैलतीरावर

इथे बदली झाली. दोन महिने होऊन गेले होते. स्वप्नालीनं संसाराचं नीट लावलं होतं. हवं–नको पाहिलं. सारं जिथल्या तिथे लावलं. वस्तूंच्या जागा बदलून नेटकेपणानं रेखीव बसतील, छान दिसतील, घराची शोभा वाढवतील अशा ठेवल्या. स्वप्नच प्रत्यक्षात रचावं तसं तिनं रचलं. समाधानानं फुलली. सगळी घडी नीट बसत आली होती.

घरही कसं छान, सुरेख होतं. समोर छोटंसं प्रसन्न अंगण. परसात जुनेपणानं खुलणारी विहीर. नारळांची दोन सरळ जाणारी, झावळ्या सोडून साऱ्या जगाला कौतुकानं बघणारी झाडं. हलणारी, डुलणारी, अंधारात गुडूप होणारी. चांदण्यात न्हाऊन निघणारी. विहिरीभोवतीच जाईजुईची फुललेली फुलं. बागेतल्या कोपऱ्यावर रात्र दरवळून टाकणारी रातराणी. चिमुकलं विश्व. चिमुकला संसार...चिमुकली नीला, मनोमनी जपणारे मुकुंदराव, यात ती दंग झाली होती.

नीला बालवाडीत जात होती. सुंदर साजुक नीलाच्या वेणीफणीमध्ये स्वप्नाली रंगून जायची. मुकुंदरावांच्या ओठावरलं मधुर गाणं टिकवून ठेवण्यात गढून जायची. स्वप्नालीचा सारा संसार सजला होता. स्वयंपाकघर, देवघर, बैठकीची खोली, सारं जिथल्या तिथं सावरुन बसलं. सारखा हात फिरवला जाऊ लागला. उल्हासानं,

मनस्वी उत्साहानं. मुकुंदरावांचा प्रेमळपणा, थट्टेखोरपणा यानं घरात चांदणं झिरपायचं. स्वप्नालीच चांदणं बनायची.

दिवसभर तिला कसंनुसं वाटायचं. करमायचं नाही. दिवस ढळला, सावली अंगणात उतरली, की चिमुकल्या नीलाची ती वाट पाहत राहायची. नीलाला घेऊन मुकुंदरावांची वाट पाहात बसायची. नजर वाटेत गुंतून जायची. खिडक्यांना लक्ष नेत्र फुटायचं. मुकुंदरावांच्यासाठीच. त्याच्याच स्वप्नात राहायची. उत्सुकता ओसंडायची. फाटक करकरलं की चटकन भानावर यायची. पातळ सावरुन उंबरठ्यात हसत उभी राहायची. चमकणाऱ्या अधीर नजरेनं स्वागत करायची. मुकुंदरावांचा अवघा शीण स्वप्नालीच्या हसऱ्या गालाच्या गोड खळीत नाहीसा व्हायचा. बोलक्या अथांगात डुंबणं व्हायचं. तृप्ती लहरायची.

गरम गरम काही. वाफळणारा चहा, दुमडल्या ओठांचा आग्रह, लाडिक नेत्रखुणा, स्पर्शसंवेदना.. नीलाचा पापा घेताना मुकुंदराव तिरक्या डोळ्यानी स्वप्नालीकडे पाहायचे. ते पाहणं उमजून स्वप्नाली एवढाले डोळे करायची. गालात जीभ घालून नाक उडवायची. पण ओठ मात्र ओले होत राहायचे. एक प्रसन्न रसरशीतपणा दोघांच्याही नसानसांतून सळसळत जायचा.

मुकुंदराव तसे स्वरुपसुंदर होते. सुडौल... सडसडीत बांधा. तलम नितळ अंगकांती. गोरेपणाची झाक. कोरीव करंदकाळ्या मिश्या... गोऱ्या गालावर शोभून दिसणाऱ्या. कुणी कुणाला उणं नव्हतं. स्वभावानं तर परस्परांच्या श्वासांना जपणारे, डोळ्यांच्या कडांत साठवणारे. अमाप सुख, अपरंपार प्रेम, गोड सहवास. दृष्ट लागावी असं जीवन. गुलाबी लोलकातून गुलाबी प्रकाश कणाकणांत झिरपत राहावा तसा संसारातला क्षण क्षण गुलाबी... मदीर. स्वतःच्या जीवनातल्या सर्वस्वाचं दान करणारी पती-पत्नी. नीलाच्या गोंडस निरागसतेची लाभलेली किनार. विकसत जाणाऱ्या कळीप्रमाणे सौख्याची एकेक पाकळी उलगडत, उमलत जात होती.

कॉलेजचं फुलपंखी जीवन संपलं. एक मोहनगरी संपली. स्वप्नालीला आता साथीदाराची स्वप्नं पडू लागली. क्षण क्षण संसाराची चित्र रंगवायची. कॉलेजात असताना तिनं कधी वास्तवाचा विचारच केला नव्हता. स्वतःभोवती तिनं कॉलेजजीवनाचा परीघ आखून घेतला होता. त्या मायावी रिंगणात ती स्थिर होती.

परीघच फिरत होता. त्या परीघाबाहेर पडल्यावर मात्र तिला जीवनाचा प्रश्न उन्मळत आला. एकदम वेगळाच प्रांत पाहून बिचकली. गोंधळली. काया थरथरली. बावरली.

विविध प्रश्न तिला छेडत राहू लागले. ती असंख्य भिरभिरणाऱ्या सावल्यांनी कोमेजू लागली. एखादा प्रकाशकण गवसला तरी त्याचीच ती चमचमणारी नक्षत्र बनवी, पण ते क्षणभरच ठरे. मग मनात–अंतर्मनात काहूर माजे...

साथीदार चांगला मिळेल का? आपल्या आशा–आकांक्षांना जपणं होईल का?... परमसुखाचं मऊ पीस अलगद हातांनी सर्वांगावरुन फिरवणारा... मनाला जपणारा... अंतःकरण ओळखणारा... सशाच्या काळजावर फुंकर घालणारा... मालीला मिळाला तसा लाभेल का? माया, वात्सल्य, प्रेम यांच्या वर्षावात न्हाणं होईल का?... की हट्ट... अप्पलपोटेपणा... नवरेगिरी... भांडणं...धुसफुस... घाण्याच्या बैलाप्रमाणे जुंपणारा नर... काय आहे आपल्या नशिबी?... सुषमाचं नाही का तसं झालं ! सुषमा... काव्यानं वेडी होणारी... काव्य जगणारी... फुलवणारी. कोवळ्या हळव्या मनाची सुषमा... तिनंही अशीच स्वप्नं पाहिली होती. मनोरथ रचले होते. काव्य जगण्याची ऊब तिनं बाळगली होती. पण प्रत्यक्षात काय घडलं? गारठून गेली. काव्य करपलं. फूल कोसळून गेलं. वासनांचा नाग फुत्कारला अन् नाजूक देह क्षयानं पोखरुन गेला. त्या दिवशी भेटली सुषमा... तिच्या डोळ्यांतली आसवं... पाठीवरले वळ... या स्मरणांनी स्वप्नाली शहारुन जायची. दचकायची. आपलीच चिंता करायची.

एस्. वाय्. बी. ए. ला असलेली वैशाली... कॉलेजचा रंगपट अर्ध्यात सोडून लग्नपटावर उभी राहिली. अजून जीवनाची कळी पाकळ्या पाकळ्यांनी उमलायची होती..... तेवढ्यात व्यसनी नवऱ्याची प्रतिक्षा करत राहणं.. रात्र जाळणं... अंधार सारा... प्रकाशाला मुठीत कवळू पाहणाऱ्या वैशालीला अंधार गिळत राहावं लागलं... अशी किती तरी स्मरणसाखळी. स्वप्नाली या मैत्रिणींच्या ठायी स्वतःला कल्पायची. अंधारात उभी राहायची. उसासायची... हुंदकायची.... तुटलेल्या पतंगासारखी अथांगात दिशाहीनपणे फरफटत राहायची.

पण तसं झालं नाही. स्वप्नालीची स्वप्नं साकार झाली. मनासारखा साथीदार लाभला. घरचं बरं होतं. सासरची माणसं मायाळू होती. नीला होईपर्यंत नवऱ्यानं

कुरवाळली. दुःख कसलं ते कळू दिलं नव्हतं. निराशेचं सावटही तिला स्पर्शून गेलं नव्हतं. नीला झाल्यावर तर नात्यागोत्यातल्या माणसांनी वात्सल्याचा वर्षाव स्वप्नालीवरच केला होता. त्या वर्षावात ती निथळत होती. लग्नापूर्वीचे आपले विचार आठवले की आपल्या खुळेपणाला हसायची ती.

जीवनाचा कोपरान् कोपरा झळझळून गेला होता. मुकुंदराव वरिष्ट अधिकारी... हुकमी... करारी. पण घरात शिरताना त्यांनी अधिकारपण फाटकाबाहेरच ठेवलं होतं. उंबरठ्याचा प्रेमळ सवंगडी म्हणूनच ते वावरत. मुकुंदरावांच्या संगतीत असताना अवघ्या विश्वाला विसरुन जायची ती. तिचंच तेवढं मधाळलेलं विश्व उरायचं. ती सत्य होती. तिचं विश्व सत्य होतं. सगळं मिळालंय, इच्छिलं त्याच्यापेक्षाही अधिक लाभलंय. मनात कल्पिलं त्याच्यापेक्षा अथांग गवसलंय. सांभाळायचंय. काळजात कोरुन ठेवायचंय. उणं ठरु नाही द्यायचं. या विचारानं खूप खूप जपायची.

नीला बालवाडीला जायची. मुकुंदराव ऑफिसला गेले की ती सारं आवरी. दार पुढे करी. पुढच्या सोप्यात कोचवर वाचत बसे. तिला काव्य वाचण्याचा भारी नाद. कविता वाचत राही. पूर्वी बालकवींच्या कविता तिला आवडत असत. स्वतः कविता करी.. बालकवींच्या 'बालविहगा'– प्रमाणे निळ्या नभात तरंगत राही. अवघ्या विश्वाला डुला–झुलायला लावी. जादूमयी मोहिनी घाली. आता तांब्यांच्या कवितांचा तिला लळा लागला.

उशीवर कशिदा काढी. कंटाळा आला की खिडकीतून बाहेर कित्येकदा पाहत राही.. ते नित्याचं होत आलं होतं. नजर उगाच फिरत राही..

रुंद ओढ्याचं पात्र. उघडे कातळ...चकाकणारे काळे पाषाण. दोहो तीरांवरचे हिरवेजर्द ताटवे. उंच कड्याच्या कुशीत चिकटून राहणारं इवलंसं झुडूप...पैलतटावरचं गणपतीचं मंदिर. पुरातन वास्तू...गर्दपणातून आकाशाच्या गर्भात शिरणारं छोटंसं शिखर... भोवताची आमराई.. देवळासमोरचा उंच पिंपळ...निळ्या नभाला शिरावर पेलणारा...तो पार...अन्...अन् त्या पारावर तो...रोजचाच.. भर दुपार...रखरखणारं ऊन...माध्यान्हवेळचं भकासपण. त्याचं एकटं बसणं...एकाकीपण.

त्याचावर तिची नजर खिळे आणि तिला भकास वाटे. पहिल्यांदा तिला काही वाटलं नाही. पण दिवसानं दिवस उलगडत गेला तसं ते दृश्य तिच्या मनात रुतून